९

# इयत्ता ७ वी च्या सामान्य विज्ञान पाठयपुस्तकाच्या आशयाचा विद्यार्थ्यांमध्ये 'जीवन कौशल्यांचा विकास' हया दृष्टीकोनातून चिकित्सक अभ्यास

प्रा . प्रियांका सुभेदार

असिस्टंट प्रोफेसर, शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

सारांश :-

जीवन जास्तीत जास्त कार्यक्षमतेने व यशस्वीपणे जगता यावे यासाठी विद्यार्थ्यांची अंगभूत कौशल्ये विकसित करण्याचा सातत्यपूर्ण व सुसंगत प्रयत्न म्हणजे जीवन कौशल्ये शिक्षण होय . माणसाला दैनंदिन जीवनातील समस्या सोडविण्यासाठी जीवन कौशल्यांचा उपयोग होतो . आपल्या आजूबाजूला हिंसाचार, सामाजिक भेद, वेगवेगळया प्रकारचे ताणतणाव बघावयास मिळतात . त्यांना समर्थपणे सामोरे जाण्यासाठी, जीवन कौशल्यांची आवश्यकता आहे . जागतीक आरोग्य संघटनेने पुढीलप्रमाणे दहा कौशल्ये पुरस्कृत केली आहेत . स्वजागृती, समानुभूती , समस्या निराकरण , निर्णय घेणे , प्रभावी संप्रेषण , चिकित्सक विचारप्रकीया , सर्जनशील विचारप्रकीया , आंतरव्यक्ती संबंध भावनांचे समायोजन ,ताणतणावाचे समायोजन .

ही जीवन कौशल्ये शालेय विषयांच्या अध्यापनातून, विविध अध्ययन प्रसंग किंवा विद्यार्थ्यांनी करावयाच्या विविध कृतीमधुनही विद्यार्थ्यांमध्ये विकसित करता येतील . ही जीवन कौशल्ये वर्गाध्यापनाच्या माध्यमातून साध्य करणे अपेक्षित आहे . विद्यार्थ्यांमध्ये जीवन कौशल्याचा विकास करण्यामध्ये शिक्षकांची भूमिका महत्वाची आहे . आजच्या शालेय शिक्षणामध्ये पाठयपुस्तक हे एक प्रभावी साधन मानले गेलेले आहे . पाठयपुस्तकाला अनन्यसाधारण महत्व आहे . त्यामुळे सध्याच्या इ . ७ वी च्या सामान्य विज्ञान पाठयपुस्तकांचा आशय विद्यार्थ्यांमधील जीवन कौशल्याच्या विकासासाठी परीणामकारक आहे का हयाचा शोध घेण्याचा प्रयत्न संशोधकाने केलेला आहे .

**प्रस्तावना :**

जीवन जास्तीत जास्त कार्यक्षमतेने व यशस्वीपणे जगता यावे यासाठी विद्यार्थ्यांची अंगभूत कौशल्ये विकसित करण्याचा सातत्यपूर्ण व सुसंगत प्रयत्न म्हणजे जीवन कौशल्ये शिक्षण होय . माणसाला दैनंदिन जीवनातील समस्या सोडविण्यासाठी जीवन कौशल्यांचा उपयोग होतो . काही वेळा आपण अनेक कौशल्यांचाही वापर करत असतो . उदा . एखादा निर्णय घेताना चिकित्सक विचार करणे . भऱ्याच वेळी जीवनकौशल्ये पालकांकडून मुलांना शिकविली जातात . तर काही वेळा मुले आपल्याला आलेल्या अनुभवातून शिकत असतात .

पूर्वीच्या काळी गुरुशिष्य परंपरा होती . त्यामध्ये शिष्य गुरुगृही राहून शिक्षण घेत . त्यातून जीवन कौशल्यांचा विकास साधला जात असे . सध्याच्या प्राथमिक स्तरावरील अभ्यासकमात जीवन कौशल्यांचा समावेश केलेला आहे . आपल्या आजूबाजूला हिंसाचार, सामाजिक भेद, वेगवेगळया प्रकारचे ताणतणाव बघावयास मिळतात . त्यांना समर्थपणे सामोरे जाण्यासाठी, जीवन कौशल्यांची आवश्यकता आहे . विद्यार्थ्यांमध्ये जीवन कौशल्यांचा विकास करण्यासाठी सामान्य विज्ञान पाठयपुस्तकाचा आशय उपयुक्त आहे का हे अभ्यासण्यासाठी संशोधकाने इ . ७ वी च्या सामान्यविज्ञान पाठयपुस्तकाचा चिकित्सक अभ्यास केलेला आहे

संशोधनाची गरज :-

युनिसेफने जीवन कौशल्यांची विशिष्ट यादी दिलेली नाही . परंतु काही आंतरव्यक्ती कौशल्ये व मनोसामाजिक कौशल्ये महत्वाची मानलेली आहेत .

जागतीक आरोग्य संघटनेने पुढीलप्रमाणे दहा कौशल्ये पुरस्कृत केली आहेत .

१) स्वजागृती २) समानुभूती ३) समस्या निराकरण
४) निर्णय घेणे ५) प्रभावी संप्रेषण
६) चिकित्सक विचारप्रकीया ७) सर्जनशील विचारप्रकीया
८) आंतरव्यक्ती संबंध .
९) भावनांचे समायोजन १0) ताणतणावाचे समायोजन

ही जीवन कौशल्ये शालेय विषयांच्या अध्यापनातून, विविध अध्ययन प्रसंग किंवा विद्यार्थ्यांनी करावयाच्या विविध कृतीमधुनही जीवनकौशल्ये विद्यार्थ्यां मध्ये विकसित करता येतील . ही जीवन कौशल्ये वर्गा अध्यापनाच्या माध्यमातून साध्य करणे अपेक्षित आहे .

विद्यार्थ्यांमध्ये जीवन कौशल्याचा विकास करण्यामध्ये शिक्षकांची भूमिका महत्वाची आहे. आजच्या शालेय शिक्षणामध्ये पाठयपुस्तक हे एक प्रभावी साधन मानले गेलेले आहे. पाठयपुस्तकाला अनन्यसाधारण महत्व आहे. त्यामुळे सध्याच्या इ. ७ वी च्या सामान्य विज्ञान पाठयपुस्तकांचा आशय विद्यार्थ्यांमधील जीवन कौशल्याच्या विकासासाठी परीणामकारक आहे का हयाचा शोध घेण्याचा प्रयत्न संशोधकाने केलेला आहे.

संशोधनाचे महत्व :-

पुर्वीच्या सामाजिक परीस्थितीमध्ये खूप बदल झालेला दिसतो. जसे की गुन्हेगारीचे वाढलेले प्रमाण, शालेय विद्यार्थ्यांच्या आत्महत्या, स्पर्धात्मक युग ह. हया समस्या कमी होण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये जीवन कौशल्यांची रुजवणूक करणे आवश्यक आहे. ही रुजवणूक करण्यासाठी शिक्षकांना पाठयपुस्तकाचा वापर करता येईल. सामान्य विज्ञानाचे अध्यापन करत असताना कोणते अध्ययन प्रसंग जीवन कौशल्याच्या विकासासाठी उपयुक्त आहेत हे संबंधित संशोधनामुळे समजणार आहे. तसेच जीवन कौशल्य विकासासाठी इ. ७ वीच्या विज्ञान पाठयपुस्तकातील कोणता आशय उपयुक्त आहे याचा शोध संशोधकाने घेतलेला आहे. संबंधित संशोधनामध्ये संशोधकाने अध्यापन करत असताना जीवन कौशल्याच्या विकासासाठी उपयुक्त अध्ययन प्रसंग सूचित केलेले असल्याने ते शिक्षकांसाठी उपयोगी ठरणार आहे.

**समस्या विधान :-**

इ. ७ वी च्या सामान्य विज्ञान पाठयपुस्तकाच्या आशयाचा विद्यार्थ्यांमध्ये 'जीवन कौशल्यांचा विकास' हया दृष्टीकोनातून चिकित्सक अभ्यास करणे.

**संशोधनाची उद्दिष्टये :-**

१) सन २००४ च्या प्राथमिक स्तरावरील सामान्य विज्ञानाच्या इ. ७ वी च्या पाठयपुस्तकातील आशय विद्यार्थ्यामध्ये 'जीवन कौशल्यांचा विकास' करण्यासाठी योग्य आहे याचा अभ्यास करणे.

२) इ. ७ वी च्या विज्ञान पाठयपुस्तकातील कोणता आशय विद्यार्थ्यांमध्ये जीवन कौशल्यांच्या विकासासाठी उपयुक्त आहे याचा शोध घेणे.

३) विद्यार्थ्यांमध्ये जीवन कौशल्य विकासासाठीचे उपक्रम सूचित करणे.

४) विद्यार्थ्यांमध्ये जीवन कौशल्य विकासासाठीचे अध्ययन प्रसंग सूचित करणे.

**गृहितके :-**

१) अभ्यासक्रमाचे हेतू साध्य करण्याचे पाठयपुस्तक हे एक साधन आहे.

२) साधारणपणे पाठयपुस्तक हे अभ्यासक्रमातील उद्दिष्टांचा विचार करुन तयार केलेले असते.

**संशोधनाची व्याप्ती :-**

१) प्रस्तुत संशोधनामध्ये इ. ७ वी च्या सामान्यविज्ञान पाठयपुस्तकाचा विचार केलेला आहे.

२) प्रस्तुत संशोधनामध्ये इ. ७ वी च्या सामान्य विज्ञान पाठयपुस्तकाचा विद्यार्थ्यांमध्ये जीवन कौशल्यांचा विकास हया दृष्टिकोनातून विचार केलेला आहे.

**मर्यादा :-**

१) प्रस्तुत संशोधन प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २००४ नुसार महाराष्ट्रातील इ. ७ वी च्या सामान्य विज्ञान पाठयपुस्तकापुरते मर्यादित आहे.

२) प्रस्तुत संशोधन इ. ७ वी च्या पाठयपुस्तकातील आशयातून जीवन कौशल्यांचा विकास हया पुरते मर्यादित आहे.

**संबंधित संशोधन साहित्याचा आढावा :-**

**भारतातील संशोधने :-**

१) भारती श्रीकला व कुमार के. व्ही. किशोर यांनी शाळेतील जीवन कौशल्य शिक्षणातून कुमारवयीन मुलांचे सक्षमीकरण या विषयावर संशोधन केले. त्यासाठी त्यांनी जीवन कौशल्य शिक्षणातून कुमारवयीन मुलांच्या मानसिक आरोग्यात वाढ करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले होते. तसेच जीवन कौशल्य शिक्षणाचे (NIMHANS) वापरले. यामध्ये त्यांना असे दिसले की जीवन कौशल्य शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना स्व आत्मविश्वास निर्माण झाला आहे व मानसिक आरोग्यात वाढ झालेली आहे.



Vol: 2nd, Issue : IV, English-Marathi, Quarterly: 1st March. 2014,ISSN : 2319-5525

**परदेशातील संशोधने :-**

२) न्यू साउथ वेल्सगव्हेर्मेंट : हयांनी काढलेल्या श्वेतपत्रिका" Securing Their Future" हयामध्ये अभ्यासकमामध्ये सुधारणा करण्यासाठी आणि इ. १२ वी च्या विद्यार्थ्यांच्या विशेष शैक्षणिक गरजा भागविण्यासाठी आवश्यकता व्यक्त केलेली आहे.

त्यामुळे अभ्यासमंडळाने इ. ६ वी साठी जीवन कौशल्ये अभ्यासकम विकसित केलेला आहे.

३) **ALL (Adult Literacy & Life Skills surey)** खिस लेन – न्यूझिलंडने ALL मध्ये २००६ या वर्षात सहभाग घेतला होता. त्यामध्ये कार्यात्मक साक्षरता गणितीय कौशल्य समस्या निराकरण कौशल्य, इ. गोष्टींचे मापन करण्यात आले. हे प्रतिसादक १६ ते ४५ हया वयोगटातील होते. त्यामध्ये असे आढळून आले की लोकांमध्ये साक्षरता, गणितीय कौशल्य यात मोठा फरक आढळून आला. त्यावर परिणाम करणारे तीन घटक म्हणजे शिक्षण पूर्ण झालेले असणे, भाषिक पार्श्वभूमी व संगणकाचा वापर.

४) ओपिओ जेर्म्स् **(Makerere University )** हयांच्या शोधनिबंध "प्राथमिक शिक्षणात जीवन कौशल्य शिक्षणाची जाणीव व उपयोजन" हयामध्ये असे दिसून आले की जीवन कौशल्यबाबतची जाणीव शिक्षक व विद्यार्थी हयांच्यात आढळून आली. तसेच मुलांमध्ये मुलींपेक्षा अधिक जीवनकौशल्य विकासाची जाणीव आढळून आली.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धती व आशय विश्लेषण तंत्राचा वापर केलेला आहे.

**संशोधनाची साधने :-**

संशोधनासाठी पडताळा सूची व मतावली हया दोन साधनांचा वापर करण्यात आला.

**संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिवर्चन :**

प्रस्तुत संशोधनात पाठयपुस्तकातील प्रत्येक आशयाचे विश्लेषण करण्यात आले. त्यासाठी पडताळा सूचीचा वापर करण्यात आला. मतावलीच्या आधारे माहिती संकलन करण्यात आले. त्यानुसार मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करुन निष्कर्ष काढण्यात आले. मुंबई परीसरातील शाळांमधील शिक्षकांकडून मतावली भरुन घेण्यात आली.

**निरीक्षणे व निष्कर्ष :**

इ. ७ वी च्या सामान्य विज्ञान पाठयपुस्तकातील आशय विद्यार्थ्यांमध्ये जीवन कौशल्यांच्या विकासासाठी उपयुक्त आहे. उदा. ७ वी च्या सामान्य विज्ञान पाठयपुस्तकामध्ये खालील जीवन कौशल्ये आढळून येतात.

स्वजागृती हे जीवन कौशल्ये, सजीवांचे संघटन, सजीवांचे प्रजनन, रक्ताभिसरण, आरोग्य व रोग, नियंत्रण व समन्वय हया घटकांमध्ये आढळुन येते. समानुभूती हे जीवनकौशल्य ध्वनी व ध्वनीची निर्मिती अन्नग्रहण व पोषण, नियंत्रण आणि समन्वय हया घटकांमध्ये आढळून येते.

समस्या निराकरण हे जीवन कौशल्ये नैसर्गिक साधनस्त्रोत, उष्णतेचे संक्रमण, रक्ताभिसरण, ध्वनी व ध्वनीची निर्मिती हया घटकांमध्ये आढळते. चिकित्सक विचारप्रकिया हे जीवन कौशल्य नैसर्गिक साधनस्त्रोत, पाणी एक नैसर्गिक साधनस्तोत्र, प्रकाशाचे संकमण, उष्णतेचे संकमण, रक्ताभिसरण, ध्वनीचे प्रसारण, विद्युतप्रभार, अन्न व अन्नाचे रक्षण, आम्ले, आम्लारी आणि क्षार, पाण्याचे गुणधर्म यामध्ये आढळते. सर्जनशील विचारप्रकिया हे जीवनकौशल्य प्रकाशाचे संक्रमण, ध्वनी व ध्वनीची निर्मिती, ध्वनींचे प्रसारण हयामध्ये आढळते.

**विद्यार्थ्यामध्ये जीवन कौशल्य विकासासाठीचे उपकम :**

इ. ७ वी च्या विज्ञान पाठयपुस्तकामध्ये प्रत्येक धडयाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी करावयाचे उपकम/कृती दिलेल्या आहेत. उदा. जलशुद्धी करण केंद्राला भेट देवून माहिती मिळविणे. परिसरातील घरे, कारखाने हॉटेल येथील पाण्याच्या वापराबद्दल माहिती मिळविणे. हयातून प्रभावी संप्रेषण, निर्णय घेणे इ. कौशल्यांचा विकास विद्यार्थ्यांमध्ये करता येतो.

हया सारख्या अनेक कृती/उपकम पाठयपुस्तकात समाविष्ट केलेले आहेत. त्या कृती जीवन कौशल्यांच्या विकासासाठी अत्यंत उपयुक्त आहेत.

**जीवन कौशल्ये विकासासाठीचे अध्ययन प्रसंग :**

हवा, पाणी, माती प्रदुषण दूर करण्याचे उपाय कोणते? उर्जा संकट कसे दूर कराल हया समस्या विद्यार्थ्या समोर ठेवून त्यावरील उपाय कोणते यासंबंधी कल्पना मांडायला प्रवृत्त करणे हयातून सर्जनशील विचारप्रक्रियेचा विकास साधता येईल.

ध्वनी प्रदूषण दूर करण्याच्या विविध उपायापैकी योग्य उपाय कोणता? माती संरक्षणाच्या विविध उपायापैकी योग्य उपाय कोणता? यांसबंधीचे प्रश्न विद्यार्थ्यांना विचारून निर्णय घेणे हया जीवन कौशल्याचा विकास येईल. तसेच विविध समस्यांवर चर्चा घडवून आणणे. उदा. अन्न भेसळ होवू नये म्हणून काय करता येईल. त्यातून समस्या निराकरण कौशल्यांचा विकास साधता येईल. तसेच खेडयातील लोकांना दुष्काळाला सामोरे जावे लागत आहे. पाणी बचतीचे कोणते मार्ग वापरता येतील यावर चर्चा घडवून आणणे. परिसंस्थेतील एखादा घटक कमी झाला किंवा वाढला तर काय होईल हया विषयीच्या कल्पना मांडायला सांगणे.

प्राथमिक स्तरावर जीवन कौशल्यांच्या विकासासाठी तशा संधी पूरविणे महत्वाचे आहे.

**संदर्भ :**

१) इ. ७ वी चे विज्ञान पाठयपुस्तक : महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पूणे.

२) मुळे उमाठे (१९९८) : शैक्षणिक संशोधनांची मुलतत्वे, विद्या बुकस्, औरंगाबाद.

3) Indian Journal of Psychictry (2010 Oct. Dec.) 344-349

4) Life skills Wikipedia :- www.gooble .com.

5) The Hau school cumiculum - www.gooble.com.

...